**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. — ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**प्रेस नोट** दि.२२.०६.२०२२

**वाशिम जिल्ह्यात पोलीस स्टेशन स्तरावर प्रतिबंधात्मक कार्यवाही सेलची स्थापना.**

***

मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्या आदेशाने मालमत्ता तसेच शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी व वाशिम जिल्ह्यातील गुंडांच्या मुसक्या आवळण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करत जास्तीत जास्त प्रतिबंधात्मक कारवाया करून वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याबाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले. वाशिम जिल्ह्यातील घडणाऱ्या चोरी, जबरी चोरी, दरोडे यांसारख्या गंभीर घटनांवर प्रतिबंध करून सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याकरिता वाशिम जिल्ह्यात नव्यानेच पोलीस स्टेशन स्तरावर एक पोलीस अधिकारी व एक पोलीस अंमलदारांचे प्रतिबंधात्मक कार्यवाही सेल स्थापन करण्यात आले आहे.

याअगोदर सुद्धा जिल्ह्यातील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे सुरूच होते आणि परिणामकारक प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. परंतु गुन्हेगारांविरुद्ध आणखीन प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी गुन्हेगारांवर निगराणी ठेवण्याकरिता मागील ०५ ते १० वर्षाचे अभिलेख पाहून ०२ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांच्या याद्या तयार करून त्यांचेविरुद्धच्या गुन्ह्यांचे प्रकाराचे विश्लेषण करून व सामान्य जनतेस विनाकारण त्रास देणारे, महिलांची छेडखाणी करणारे गुन्हेगार आणि जेलमधून सुटलेले गुन्हेगार या सर्व गुन्हेगारांच्या हालचालींवर अधिक प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यात एकूण १३ पोलीस स्टेशनमध्ये प्रत्येकी ०१ पोलीस अधिकारी व ०१ पोलीस अंमलदारांचे प्रतिबंधात्मक कार्यवाही सेलची व पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम येथे ०१ केंद्रीकृत पथक तयार करण्यात आले आहे. याद्वारे सराईत गुन्हेगारांविरुद्ध त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपावरून फौजदारी प्रक्रिया संहिता, महाराष्ट्र पोलीस कायदा, महाराष्ट्र दारूबंदी कायदा, महाराष्ट्र झोपडपट्टी दादा कायदा अशा कायद्यान्वये प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे. मागील वर्षभरात पोलीस अधिक्षक कार्यालयातील प्रतिबंधात्मक कार्यवाही पथकाने १०७ फौजदारी प्रक्रिया संहितानुसार ३६६ प्रतिबंधात्मक कारवाया व ११० फौजदारी प्रक्रिया संहिता अनुसार १६३ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी जनतेस आवाहन केले आहे कि, जनतेने अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांना न घाबरता पुढे येऊन त्यांच्याविरोधात तक्रार द्यावी जेणेकरून अशा गुंड प्रवृत्तीच्या इसमांच्या मुसक्या आवळून गुन्हेगारीवर प्रतिबंध करण्यात येईल.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.